# मेट्रो-३ नव्हे, आता 'ॲक्वा लाईन'

» मुंबई (प्रतिनिधी) :

महत्त्वाकांक्षी असा कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ भुयारी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनसमोर (एमएमआरसी) आहे. मेट्रो-३साठी डबे तयार करण्याचे काम ॲलस्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया कंपनीला देण्यात आले असून या डब्यांच्या प्रतिकृतीचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच मेट्रो-३च्या भुयारी मार्गिकेला यावेळी 'ॲक्वा लाईन' अशी नवी ओळख अर्थात नवे नाव देण्यात आले आहे.

एमएमआरसीने मेट्रो-३च्या कामाला वेग दिला आहे. एकीकडे भुयारीकरणाचे काम वेगात सुरू असताना आता दुसरीकडे रोलिंग स्टॉक अर्थात रूळ, मेट्रो गाड्या-डबे तयार करण्याच्या कामालाही



## अशी असेल ॲक्वा लाईन मेट्रो-३

- सुरक्षित आरामदायी, वातानुकूलित प्रवास
- प्रवाशांच्या मनोरंजनासाठी व जाहिरातीसाठी एलसीडीचा वापर
- मार्गिकेचा डिजिटल नकाशा
- प्रवाशांसाठी उद्घोषकांचा वापर
- दिव्यांग प्रवाशांच्या सोयीसाठी व्हीलचेअर ठेवण्याची स्वतंत्र व्यवस्था
- प्रवाशांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही
- अग्निशमन आणि अग्निशोधन यंत्रणा

## डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण

एमएमआरसीने वेग दिला आहे. मेट्रो-३साठी ८ डब्यांच्या ३१ मेट्रो गाड्या तयार करण्यात येणार आहेत. आंध्र प्रदेशातील अँलस्टॉम ट्रान्सपोर्ट इंडिया ही कंपनी मेक इन इंडियाअंतर्गत डब्यांची निर्मिती करणार आहे. मेट्रो-३मधील गाड्या या चालकाशिवाय धावणाऱ्या असून 'ॲक्वा लाईन' या नावाप्रमाणे गाड्यांची-डब्यांची रचना केली जाणार आहे. फिका हिरवा अर्थात ॲक्वा ग्रीन आणि फिका पिवळा (बेज) या रंगाचा वापर यात केला जाणार आहे. जेणेकरून समुद्राच्या लाटांचा आभास होईल.